आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२३ डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी संस्थांमधील सहकार्याचे महत्त्व वाढले असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- युवकांना रोजगार देताना संपूर्ण पारदर्शकता अवलंबली जात असून रोजगार मिळालेल्या युवकांनी समर्पण आणि सत्यनिष्ठेनं देशसेवा करावी, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं इयत्ता पाचवी ते आठवीसाठी सरसकट उत्तीर्ण करण्याचं धोरण आज केलं रद्द

- पाकिस्तान क्रिकेट मंडळाने आयसीसी चँपियन्स करंडक २०२५च्या भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची केली निवड

**आणि**

- दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते प्रसिद्ध दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचं निधन

**<><><><><>**

वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वाढता वापर यामुळे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी संस्थांमधील सहकार्य अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे. नवी दिल्लीत आज संध्याकाळी वर्धमान महावीर वैद्यकीय महाविद्यालय आणि सफदरजंग रुग्णालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्ता, एमआरएनए तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि थ्रीडी बायोप्रिंटिंगमधील प्रयोग वैद्यकीय क्षेत्रात मोठे बदल घडवून आणणार

आहेत. संशोधन आणि नवोपक्रमासाठी वर्धमान महावीर वैद्यकीय महाविद्यालय आणि सफदरजंग रुग्णालय, दिल्लीतल्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थांबरोबर मिळून काम करू शकतात, हे आंतरविद्याशाखीय ज्ञानाचं आदानप्रदान सर्वांच्या हिताचं असेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती मुर्मू यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

गेल्या दीड वर्षांत सुमारे १० लाख युवकांना सरकारी नोकरी मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. देशभरात आज ४५ ठिकाणी रोजगार मेळावे घेण्यात आले त्या माध्यमातून ७१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्राचं वाटप केलं. गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध ठिकाणी रोजगार देण्यात आले आहेत.

या मेळाव्यांत उपस्थित असलेल्या युवकांशी प्रधानमंत्री मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. युवकांना रोजगार देताना संपूर्ण पारदर्शकपणे दिले जात असून रोजगार मिळालेल्या युवकांनी समर्पण आणि सत्यनिष्ठेनं काम करत देशसेवा करावी, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

भारताला २०४७ पर्यंत विकसीत राष्ट्र बनवायचे आहे. यासाठी देशहिताचे निर्णय आणि योजना आखताना युवकांना केंद्रस्थानी ठेवल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशाचा विकास हा तिथल्या युवकांची मेहनत, क्षमता आणि नेतृत्वावर अवलंबून असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. रोजगार मेळाव्यात ५० हजारांहून अधिक नियुक्त्या अर्ध सैनिक दलात झाल्याची माहिती कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी दिली.

**<><><><><>**

येत्या २५ तारखेला प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नदी जोड प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज पुण्यात ही माहिती दिली. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत, कृषी आर्थिक संशोधन केंद्राच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात चौहान बोलत होते. कमी पाण्यात अधिकाधिक सिंचन व्यवस्था विकसित करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. संपूर्ण जगासाठी भारत हे अन्नधान्याचं कोठार होण्याच्या दृष्टीने सरकार पूर्ण प्रयत्न करत असल्याचं चौहान यांनी सांगितलं. कीटकनाशकांचा अनियंत्रित वापर कमी करून, नैसर्गिक शेतीवर भर देण्याचं आवाहन चौहान यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त, उद्या २४ डिसेंबरला ग्राहक व्यवहार विभाग, जागो ग्राहक ॲप, जागृती ॲप आणि जागृती डॅशबोर्ट लॉन्च करणार आहे. या ॲपमुळे फसवणुकीच्या प्रकरणाविरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ॲपमुळे ग्राहकांना URLची माहिती मिळणं शक्य होईल, तसंच यातून काही धोका असल्यास ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे. जागृती ॲपमुळे ग्राहकांना URL ची तक्रार करता येणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं इयत्ता पाचवी आणि आठवीत सरसकट विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचं धोरण आज रद्द केलं. आता अनुत्तीर्ण होणारे विद्यार्थी पुढच्या वर्गात जाऊ शकणार नाहीत. त्यांना दोन महिन्यांच्या आत फेरपरीक्षा देऊन पुढच्या वर्गात जाता येईल, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी दिली.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचं प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढता येणार नसल्याचंही त्यांनी सांगितलं. विद्यार्थ्यांच्या चांगल्या भवितव्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी वैज्ञानिक आणि शेतकरी यांच्यात संवाद साधायला हवा. कृषी संशोधन परिषद किंवा इतर तत्सम संस्थांद्वारे प्रकाशित होणारे कृषी संशोधन संबंधी अहवाल शेतकऱ्यांना मिळायला हवं, असं शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं.  ते पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पाॅलिटिक्स आणि इकानाॅमिक्स संस्थेच्या अमृत महोत्सव कार्यक्रमात  बोलत होते.. ते  म्हणाले की,

**बाईट होल्ड- शिवराजसिंह चौहान**

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस.जयशंकर उद्यापासून सहा दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची भेट घेऊन द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील.

**<><><><><>**

`परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशींची हत्याच झाली आहे या हत्येला, जबाबदार असणाऱ्या पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची राहुल गांधी यांनी आज भेट घेतली. त्यावेळी ते वार्ताहरांशी बोलत होते. सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस  कोठडीतल्या  मारहाणीमुळे झाला असून मुख्यमंत्र्यांनी

या प्रकरणी विधानसभेत खोटी माहिती दिल्याचे सांगत तेही याप्रकरणी तितकेच जबाबदार आहेत, असंही राहुल गांधी या वेळी म्हणाले.

<><><><><>

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामात होत असलेल्या विलंबाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे काम एका महिन्याच्या आत पूर्ण न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी कंत्राटदार कंपनीला दिला आहे.

नव्या धावपट्टीच्या कामाची निविदा गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर यावर्षी १ मे रोजी के. जी. गुप्ता कंपनीला या कामाचे कार्यादेश देण्यात आले. अद्याप हे काम पूर्ण न झाल्याच्या तक्रारी त्यांच्याकडे आल्या होत्या, त्यावर त्यांनी हे आदेश दिले आहेत.

<><><><><>

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं २०२५च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी,तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत. त्या देशात कोणत्या ठिकाणी हे सामने होणार हे पाकिस्तान क्रिकेट मंडळानं स्पष्ट केलं नसलं, तरी दुबईमध्ये हे सामने होतील, अशी शक्यता आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजे आयसीसीसाठी स्पर्धेचं वेळापत्रक निश्चित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

<><><><><>

प्रसिद्ध दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचं नुकतंच निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. पदमश्री, पद्मभूषण, आणि दादासाहेब फाळके पुरस्कारांनी ते सन्मानित होते.

**<><><><><>**

विजय हजारे कंरडक क्रिकेट स्पर्धा सुरू असून आज मुंबई विरुद्ध हैदराबाद संघांमध्ये झालेल्या सामन्यात मुंबईच्या संघाने ३ गडी राखून विजय मिळवला. अहमदाबाद इथे हा सामना झाला. मुंबई संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. हैदराबाद संघाने सर्वबाद १६९ धावा केल्या आहेत. मुंबईकडून अथर्व अंकोलेकर याने चार तर आयुष म्हात्रे याने तीन गडी बाद केले. मुंबई संघाच्या फलंदाजीची सुरुवात देखील फारशी चांगली झाली नाही. सलामीला उतरलेले अंगक्रिश रघुवंशी आणि आयुष म्हात्रे अनुक्रमे १९ आणि २८ धावांवर बाद झाले. त्यानंतर फलंदाजीला आलेले पाच फलंदाज झटपट तंबूत परतले. सातव्या विकेटसाठी उतरलेल्या तनुष कोटियन याने केलेल्या ३९ धावा आणि श्रेयस अय्यरच्या ४४ धावांच्या बळावर मुंबई संघाने १७५ धावा केल्या आणि हा सामना जिंकला.

**//<><><><><>//**